**लिंबुवर्गीय फळपिकांवर मराठवाडयाकरीता तंत्रज्ञान अभियान**
**विस्तार शिक्षण संचालनालय,**
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्‍यापीठ, परभणी**

जा.क्र. टिएमसी/डिईई/346/ 2017
दिनांक : 21.02.2017

# <u>निवेदन</u>

लिंबुवर्गीय फळपिकांवर मराठवाडयाकरीता तंत्रज्ञान अभियान, विस्तार शिक्षण संचालनालय, वनामकृवि, **परभणी अंतर्गत 04 दिवसाचा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम** मोसंबी, संत्रा, लिंबु, उत्पादक बागायतदाराकरीता **दि. 07 मार्च ते 10 मार्च 2017** या कालावधीत आयोजीत करण्यात आला आहे. या प्रशिक्षणात रोपवाटीका व्यवस्थापन, उत्पादन, पीक संरक्षण व काढणी पश्चात तंत्रज्ञान या बाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

प्रशिक्षणार्थीची राहण्याची व भोजनाची व्यवस्था या कार्यालयाद्‍वारे करण्यात येणार असुन, प्रशिक्षणाच्या वेळी संबंधीत माहितीच्या घडी पत्रिका पुरवविण्यात येतील. प्रशिक्षणारकरीता परभणी येथे येण्याचा व जाण्याचा सर्व खर्च प्रशिक्षणार्थींना स्वत: करावा लागेल. सदरील प्रशिक्षण टिएमसी कार्यालय, शेतकरी भवन, विद्‍यापीठ प्रशासकीय इमारती समोर, वनामकृवि, परभणी येथे आयोजीत करण्यात येत आहे.

तरी मराठवाडयातील इच्छुक लिंबुवर्गीय फळ उत्पादक बागायतदारांनी **दि. 01.03.2017** पर्यंत या कार्यालयाशी संपर्क साधुन, आपली नावे नोंदणी करावीत. प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल, साधरणता **40 ते 50 बागयतदारांना** प्रशिक्षण देण्यात येईल तसेच प्रतिसादानुसार सदरील प्रशिक्षण परत एकदा आयोजीत करण्यात येईल. असे निवेदन समन्वयक टिएमसी तथा संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांनी माहितीस्तव कळविले आहे.

समन्वयक (टिएमसी) तथा
संचालक विस्तार शिक्षण
वनामकृवि, परभणी

सपंर्क
प्रभारी अधिकारी (टिएमसी)
वनामकृवि, परभणी
दुरध्वनी क्रमांक (02452-220685)